परिशिष्ट 'क'

# नारायण सुमंत यांची मुलाखत

# परिशिष्ट 'क'

# नारायण सुमंत यांची मुलाखत

**मी :** आपण काव्यलेखनाला कधीपासून सुरुवात केली ?

**नारायण सुमंत :** इयत्ता ९ वी किंवा १० वीत असताना लेखनाची सुरुवात झाली, सालात सांगायचे झाल्यास १९६९ किंवा १९७० साली लेखनास सुरुवात झाली.

**मी :** कविता कशी जन्मते ? तिची निर्मितीप्रक्रिया कशी असते ?

**नारायण सुमंत :** अंतर्मन आणि बहिर्मन ही दोन्ही मने संवादी होतात तेव्हा लेखनाची उर्मी येते आणि प्रतिभावंत लिहिता होतो. कविता जन्मताना तिचेवर, कवीचे संचित, भोवतालची सामाजिक स्थिती, त्या वेळचे कवीचे वय, कवी मनावरील कौटुंबिक, सामाजिक संस्कार, कवीचे भाषेवरील प्रभुत्व इ. अनेक घटकांचा प्रभाव असतो.

**मी :** कवीने प्रतिमांच्याच भाषेत बोलावे काय ? याबद्दल आपले काय मत आहे ?

**नारायण सुमंत :** प्रतिमांच्याच भाषेत कवीने बोलले पाहिजे हा दुराग्रह ठरेल. प्रतिमासृष्टी ही संवेदनेला व्यक्त होण्यास पूरक ठरते. तसेच व्यक्ती पातळीवरील संवेदना किंवा जाणीव ही प्रतिमांच्या वापरामुळे समूह पातळीपर्यंत पोहोचवता येते हे जरी खरे असले तरी प्रतिमांच्या अतिरेकी वापराने रसहानी होण्याचीही शक्यता असते. तात्पर्य जेथे प्रतिमांची गरज असते तेथेच प्रतिमा याव्यात.

**मी :** कविता लेखनासाठी कोणकोणते गुण आवश्यक आहेत ? कवी हा जन्मावा लागतो, हे खरे आहे काय ?

**नारायण सुमंत :** कवी हा जन्मावाच लागतो. कविता लेखनासाठी व्यक्त होण्याची आंतरिक ओढ निसर्गस्त असावी लागते.

**मी :** आपले अनुभवविश्व, शेती व शेतकरी यांच्या भोवतीच फिरते, इतर विषयाकडे आपण का वळला नाहीत ?

**नारायण सुमंत :** शेती आणि शेतकरी यांच्या व्यतिरिक्त इतर विषयही कवितांतून आलेले आहेत. उदा. वृक्षवेद, नारायण पासष्टी संग्रहातील अनेक कविता.

**मी :** शेतकऱ्यांची दिवसें-दिवस वाईट अवस्था होत आहे याबद्दल संवेदनशील कविमनाची काय प्रतिक्रिया आहे ?

**नारायण सुमंत :** ''पेरीन बंडखोरी रक्तात कुणबटांच्या
ते पाय वामनाचे बेड्यात टाकू येथले''

**मी :** वाढत्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या याविषयी काय सांगाल ?

**नारायण सुमंत :** सध्या शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्यांची कारणं मानवनिर्मित आहेत. ही मानवनिर्मित कारणे नष्ट करणे माणसाच्या आवाक्यात आहेत. इच्छाशक्तीचा अभाव आहे.

**मी :** ग्रामीण विश्वातच आपली कविता फुलते, या अनुभवविश्वाविषयी माहिती दया.

**नारायण सुमंत :** अनुभवविश्व हे लेखनातूनच, कलाकृतीतूनच साकारते, त्याची माहिती देता येत नसते.

**मी :** आपल्या कवितेवर संत साहित्याचा विलक्षण प्रभाव जाणवतो, त्यामागची कारणमीमांसा सांगा.

**नारायण सुमंत :** ग्रामसंस्कृतीत वाढल्याने गावात येणाऱ्या वारीच्या दिंड्या, त्यातील भजन, कीर्तन, भारूड आणि गावच्या मंदिरातील उत्सव यामधून संत साहित्याचा संस्कार माझ्या बालमनावर झाल्याने संत साहित्याचा प्रभाव माझ्या लेखनावर जाणवतो.

**मी :** ना. धों. महानोरांचा तुमच्या कवितेवर प्रभाव जाणवतो, कशामुळे ?

**नारायण सुमंत :** माझ्या 'रानभैरी' या पहिल्या कवितासंग्रहातल्या काही कवितांवर महानोरांचा प्रभाव असल्याचा दावा केला जातो. पण संत साहित्य व समकालीन कवी यांचा प्रभाव प्रत्येक कवीवर असतोच. माझ्या कवितांवर माझ्या अभ्यासानुसार ग. ल. ठोकळ, गदिमा, भा. रा. तांबे, बहिणाबाई यांचा विशेष प्रभाव आहे, कारण हे कवी मला शालेय वयात अभ्यासक्रमात होते.

**मी :** 'डिश अँटिना' ही गेय कविता खूप गाजली तिचे गमक काय ?

**नारायण सुमंत :** खेड्यातल्या आजच्या वास्तवाचे नेमके चित्रण, उपरोधिक शैली, साधी सोपी शब्दकळा आणि प्रवाही असणारे वज्रेश्वरी वृत्त.

**मी :** आपण कविता गाऊन दाखवता, कशासाठी व का ?

**नारायण सुमंत :** कविता (माझ्या) गाण्याजोगा आवाज आहे म्हणून गाता येण्याजोग्या (वृत्तबद्ध, छंदबद्ध) कविता गाऊन सादर करतो. वृत्तबद्ध कविता गाता येतात. अशा कविता नुसत्या वाचण्याने त्या वृत्ताचे नादमाधुर्य प्रगट होत नाही.

**मी :** कविता गायन करीत असताना अधूनमधून विश्लेषण कशासाठी करता?

**नारायण सुमंत :** कविता उपरोध उपहास शैलीतील असल्यास त्यातील काही शब्दांच्या इतर अर्थछटा उलगडण्यासाठी नेमके सूचक विश्लेषण केल्याने अशी कविता खुलते आणि मूळ आशयातील उपरोधाला धार येते.

**मी :** आपण प्रामुख्याने गेय कविता लिहिता त्यापाठीमागचे रहस्य काय ?

नारायण सुमंत : प्रामुख्याने मुक्तछंदाच्या कविता लिहितो. प्रसिद्ध चार कविता संग्रहातले तीन कवितासंग्रह मुक्तछंदातील कवितांचे आहेत.

**मी :** गेय कवितेमध्ये कोणत्या आविष्कार तंत्राचा वापर करता ?

**नारायण सुमंत :** वृत्तामधली व छंदामधली प्रत्येक कविता गेय असते. ती चालीमध्ये म्हणताना त्यातील प्रतिमा आणि आशय हा भावमुद्रा व मर्यादित हस्तमुद्रेतून सादर करण्याचा प्रयत्न करतो.

**मी :** आपल्या गेय कवितेचे वेगळेपण म्हणून काय सांगता येईल ?

**नारायण सुमंत :** माझ्या किंवा इतर कवींच्या वृत्तामध्ये व छंदामध्ये लिहिलेल्या सर्व कविता गेय असतात, वृत्तबद्ध असणे हेच वेगळेपण असते.

**मी :** गेय कवितेवर काही आक्षेप घेतले जातात, त्याविषयी आपले मत काय?

**नारायण सुमंत :** 'निंदकाचे घर असावे शेजारी.'

**मी :** काव्यगायन महाराष्ट्रभर लोकप्रिय आहे, लोकप्रियतेची मीमांसा सांगा.

**नारायण सुमंत :** शब्दांपेक्षा स्वरांचे माध्यम प्रभावी असते. सुंदर आशयासोबत सुरेलता असेल तर रसिकाच्या अनुभूतीला साहाय्यक ठरते. गायलेल्या कवितेचा आशय सुरावलीमुळे समूह पातळीवर उतरण्यास मदत होते. कवितेची रसिकाकरिता स्मरणीयता वाढते.

**मी :** गेय कविता निर्माण होत असताना काही बंधने जाणवतात का ? कोणती ?

**नारायण सुमंत :** गेय कविता वगैरे स्वतंत्र आकृतिबंध नाही. वृत्तबद्ध व छंदोमय कविता सुरासहीत गाता येते व ती त्या पद्धतीने गायली तर ती गेय समजली जाते. वास्तवत: ती वृत्तातली कविता असते. गाता न येणाऱ्या अनेक मान्यवरांच्या कविता व्यावसायिक गायक/ गायिकेंनी गायिल्या आहेत. याचा अर्थ त्या कविता त्या कवींनी गेय म्हणून लिहिल्या असा होत नाही, तसेच ज्या कवींना स्वत:स गाता येते त्यांनी या कविता गाता येते म्हणून वृत्तामध्ये लिहिल्या; असाही अर्थ होत नाही. तात्पर्य कविता लिहितानाची भाववृत्ती आणि येणारा आशय यानुसार कविता लिहिली जाते. त्यामुळे कोणतीही कविता लिहिताना मला कुठलीच बंधने जाणवली नाहीत.

**मी :** आपण काव्यगायनाला कधीपासून सुरुवात केली ?

**नारायण सुमंत :** १९७५ पासून व्यासपीठावरील काव्यगायनास सुरुवात केली.

**मी :** नव्या पिढीतील गेय कवितेविषयी काय सांगू शकाल ?

**नारायण सुमंत :** वृत्तांचा आणि छंदांचा पूर्ण अभ्यास करून प्रथम ती आत्मसात करा. वृत्तबद्ध लिहिणे नंतरच गाता येण्याजोगी कविता लिहिता येते.

891.461
BHO
T15417

**मी :** गेय कवितेच्या भवितव्याविषयी आपणास काय वाटते ?

**नारायण सुमंत :** मराठी कवितेतील गेयता अक्षर आहे.